विद्याविकास

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

**डॉ. अभिजीत कुलकर्णी**
**संचालक**

संदर्भ क्र. विविमं/२०२४–२५/५६४ दिनांक : २८/०८/२०२४

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित **पुणे जिल्हयातील**

सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,

विद्यापीठ परिसरातील सर्व संबंधित शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : दि. ३१/०८/२०२४ रोजी महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने आयोजित रोजगार व स्वयंरोजगार महामेळाव्या संदर्भात..**

**संदर्भ : क्र.३१/आस्था/रोमे/१९३९२२/२०२४ दिनांक २२/०८/२०२४ चे पत्र.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदभीर्य पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, दि. ३१/०८/२०२४ रोजी शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, पुणे, समर्थ युवा फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे शहरात शिवाजीनगर येथील मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, शिवाजीनगर, पुणे ४११००५ येथे सकाळी १०.०० वाजता ‘‘रोजगार व स्वयंरोजगार महामेळावा’’ चे आयोजन करण्यात आले आहे.

महारोजगार मेळाव्यास महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, उद्योग मंत्री, कौशल्य विकास, नाविन्यता व उद्योजकता मंत्री व उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उपस्थित राहणार आहे. सदर रोजगार मेळाव्यात पुणे जिल्हयातील औद्योगिक परिसरातील नामांकित उद्योजक सहभागी होणार असून विविध शाखेतील पात्रताधारक उमेदवारांसाठी रिक्तपदे उपलब्ध आहेत. मा. सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, पुणे यांनी सावित्रीबाई पुणे विद्यापीठाशी संलग्नित पुणे जिल्हयातील महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थेतील नोकरी इच्छुक उमेदवारांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी सदर रोजगार मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहण्याबाबत निर्देश दिले आहेत. या संबंधीचे सविस्तर पत्र, आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

शासन निर्देशानुसार सदर दि. ३१/०८/२०२४ रोजी होणाऱ्या ‘‘रोजगार व स्वयंरोजगार महामेळाव्याची’’ माहिती आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील मुख्य सूचना फलकावर तसेच विद्यार्थी एकत्र येत असतात (उदा. ग्रंथालय/वाचनकक्ष/वर्गखोल्या/विश्रांतीगृह/उपहारगृह/वसतिगृह) अशा दर्शनीय भागात प्रदर्शित करुन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या संदर्भात प्रोत्साहित करावे तसेच सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत संबंधितास सूचित करावे. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

महाराष्ट्र शासन
कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र
४८१, रास्ता पेठ, पुणे
दुरध्वनी क्र.(०२०) २६१३३६०६ ई-मेल-punerojgar@gmail.com
संकेतस्थळ-:-https://rojgar.mahaswayam.gov.in

क्र.३१/ आस्था/ रोमे/ १८३८-२२ /२०२४ दिनांक २२/०८/२०२४

विषय- दि. ३१/ऑगस्ट २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने आयोजित रोजगार व स्वयंरोजगार महामेळाव्या संदर्भात

संदर्भ - १) मा.उपआयुक्त कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता विभागीय आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र.कौविरोवउ/विआपु/रोमे/१८९६-९७ दिनांक २१/०८/२०२४

२) मा अध्यक्ष समर्थ युवा फौडेशन यांचे दिनांक २१ ऑगस्ट २०२४ चे पत्र

कार्यालयीन आदेश

उपरोक्त विषयाकिंत संदर्भ क्र.१ व २ च्या अनुषंगाने पुणे शहरात शिवाजीनगर येथील मॉर्डन कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे रोजगार व स्वयंरोजगार महामेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे तरी सदर मेळाव्याच्या अनुषंगाने पूर्वतयारी करता या कार्यालयातील खालील अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करण्यात येत आहे.

सदर अधिकारी/ कर्मचारी यांनी महारोजगार मेळाव्याच्या दृष्टिने सहभागी उद्योजक,स्वंयरोजगार योजना राबविणारी महामंडळे यांना संपर्क करणे व मेळाव्यास उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात यावे . तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची माहिती उद्योजक व उमेदवार यांना देणे. महारोजगार मेळाव्यास आवश्यक आसणा-या ( उमेदवार उपस्थिती,उद्योजक उपस्थिती, नोकरीस निवड केलेल्या उमेदवाराची माहिती सकंलीत करणे आवश्यक असणा-या सर्व फाईल इत्यादी )

त्याचबरोबर समर्थ युवा फौडेशन यांचेशी संपर्क करुन महारोजगार मेळाव्याचे नियोजन करण्यात यावे.महारोजगार मेळाव्यास महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री,उद्योग मंत्री ,कौशल्य विकास,नाविन्यता व उद्योजकता मंत्री व उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उपस्थित राहणार आहे.

तरी सदरच्या मेळाव्यास जास्तीत जास्त उद्योजक व उमेदवार उपस्थित राहतील याबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल निम्नस्वाक्षरीतांना वेळोवेळी देण्यात यावा.

( सचिन ता जाधव )
सहायक आयुक्त
कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता
पुणे

प्रति,

१) श्री.सुरज महाजन,परिविक्षाधिन सहायक आयुक्त,जि.कौ.वि.रो.व उ.मा केंद्र पुणे (९९७०५०७७८४९)

२) श्री. सचिन ढेरे,वरिष्ठ, जि.कौ.वि.रो.व उ.मा केंद्र पुणे (९९२३४८१७१७)

३) सकेंत लोहार,विभागीय समन्वयक, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास मागास महामंडळ ( ९८८१४८५००१)

प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर

१) मा.अध्यक्ष श्री.राजेश पांडे, समर्थ युवा फौडेशन पुणे यांना कळविण्यात येते की, उपरोक्त अधिकारी/कर्मचारी यांना महारोजगार मेळाव्याबाबत संपर्क करण्यात यावा.